# व्यसनाने आयुष्याचे नुकसान करू नका : रेडकर

दोडामार्ग, ता. २८ : 'ज्यांच्या हातात उद्या देश जाणार आहे, ती पिढी व्यसनांमुळे बरबाद होत आहे. अमली पदार्थांच्या सेवनाने जे क्षणीक सुख भेटते, त्या सुखाच्या मागे लागून आयुष्याची राखरांगोळी करू नका, असे आवाहन दोडामार्ग ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. रामदास रेडकर यांनी केले. लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात सांस्कृतिक विभागामार्फत झालेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती व जागतिक अमली पदार्थविरोधी दिनाच्या कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, ''छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. दीन-दुबळ्यांच्या शिक्षणासाठी शाळा, वसतिगृहे काढली. शिक्षण हे जनजागृतीचे प्रमुख साधन आहे. तंबाखू, दारू, सिगारेट, चरस, गांजा, अफू, धुम्रपानामुळे सामाजिक स्वास्थ बिघडत आहे. देश प्रगतीपथावर न्यायचा असेल, तर या व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे.''

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सदस्य स्वातंत्र्यसेनानी भाई परमेकर, तसेच प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील उपस्थित होते. या वेळी छत्रपती शाहू महाराज व्यक्ती व कार्य या विषयावर निबंध स्पर्धा झाली.प्रा. दिलीप बर्वे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. एन. जाधव यांनी आभार मानले.




दोडामार्ग : येथे मार्गदर्शन करताना डॉ. रामदास रेडकर. शेजारी भाई परमेकर, प्राचार्य डॉ. व्ही. ए आदी.